# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन खाते

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५

अंतर्गत

पोटकलम ४(१) (बी) अन्वये

*घन कचरा व्यवस्थापन*

खात्याची माहिती

## नियमपुस्तिका - १

घन कचरा व्यवस्थापन खात्याचे कार्य, कर्तव्ये

आणि अन्य तपशील

**(दि. ३१.३.२०१५ पर्यंत सुधारीत)**

**एक) घन कचरा व्यवस्थापन खात्याचे कार्य, कर्तव्ये आणि अन्य तपशील :-**

मुंबई हे भारतातले प्रमुख महानगर असून ते महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे. महाराष्ट्र राज्याबरोबरच ती संपूर्ण भारताची औद्योगिक वित्तिय आणि वाणिज्य राजधानी देखील आहे. मुंबई ही केवळ भारताचीच नव्हे तर विशेष करुन दक्षिण-पूर्व आशिया व सर्वसाधारणपणे आशियाई व्यवसाय, वाणिज्य आणि उद्योगाची मध्य नाडी आहे.

मुंबई शहराची भौगोलिक व्याप्ती पश्चिमेस कुलाबा ते दहिसर व पूर्वेस कुलाबा ते मुलुंड अशी असून त्यास “बृहन्मुंबई” असे संबोधण्यात येते. वर्ष २०११ च्या जन गणनेप्रमाणे बृहन्मुंबईची लोकसंख्या १कोटी २४ लाख असून तरंगती लोकसंख्या ३० लाख आहे. बृहन्मुंबई शहराचे क्षेत्रफळ ४३७.७१ चौरस किलोमीटर आहे, पैकी शहर विभागाचे ६८.७१, पश्चिम उपनगराचे २१०.५४ आणि पूर्व उपनगराचे १५८.४६ चौरस किलोमीटर इतके क्षेत्रफळ आहे. शहरविभागातील लोकसंख्येची घनता दर चौरस किलो मीटर मागे ४६ हजारापासून बदलते. उपनगरातील लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटर मागे जवळजवळ २० हजाराने बदलते. बृहन्मुंबईतील रस्त्यांची एकूण लांबी १९४१ किलोमीटर आहे.

बृहन्मुंबईत प्रतिदिन प्रशासन व सार्वजनिक सेवा देण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून केले जाते. बृहन्मुंबई महानगरपालिका ही लोकांनी, लोकांमधून आणि लोकांसाठी ५ वर्षाच्या कालावधीकरिता निवडून दिलेल्या २२७ लोकप्रतिनिधी अशी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आपली कार्य, कर्तव्ये, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (अद्यावत सुधारीत) अंतर्गत विविध तरतूदींनुसार, बजावते. या नागरी प्रशासनामध्ये खालील नऊ प्राधिकरणांचा समावेश होतो.

अ) महानगरपालिका
ब) स्थायी समिती
क) सुधार समिती
ड) बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समिती.
इ) शिक्षण समिती
य) प्रभाग समित्या

र) महापौर

ल) महानगरपालिका आयुक्त

व) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम.

उपरोक्त प्राधिकरणांपैकी ज्या समित्या आहेत त्या निर्वाचित नगरसेवकांकडून प्रस्थापित केल्या जातात व त्या त्यांच्याशी निगडीत विषयांबाबत घेण्यात आलेल्या निर्णयास जबाबदार असतात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील घन कचरा व्यवस्थापन खात्याचे कार्य, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८मधील कलम ६१(अे) आणि ६१(सी) अंतर्गत मुंबई महानगरपालिकेने पार पाडावयाची जी बंधनकारक कर्तव्ये आहेत त्यातील प्रकरण क्रमांक पंधरा, कलम ३६५ ते ३७३ अंतर्गत तरतूदींनुसार दैनंदिन काम पार पाडले जाते. त्यापैकी घन कचरा व्यवस्थापन खात्याने पार पाडावयाची बंधनकारक कर्तव्ये खालील प्रमाणे आहेत :-

अ) रस्ते झाडणे

ब) तात्पुरत्या साठवणीसह घन कच-याचे संकलन करणे.

क) संकलन करण्यात आलेल्या कच-याचे निरसन आणि परिवहन करणे.

ड) घन कच-याची अंतिम विल्हेवाट लावणे.

इ) मृत जनावरांची विल्हेवाट लावणे.

फ) सार्वजनिक रस्त्यांची साफसफाई करणे.

घन कचरा व्यवस्थापन खात्याचे प्रमुख प्रमुख अभियंता (घकव्य) हे असून घ.क.व्य.खात्याचे साफसफाई, प्रचालन, नियोजन, परिवहन आणि पर्यावरण या उपविभागांचे प्रमुख आहेत. ते महापालिका उप आयुक्त (घ.क.व्य.)/ अतिरिक्त महापालिका आयुक्त / मा. आयुक्त हयांच्या नियंत्रणाखाली कार्य करतात. प्रमुख अभियंता (घकव्य) हयांना अभियांत्रिकी बाजूने ५ उप प्रमुख अभियंते, २२ कार्यकारी अभियंते, ५८ सहाय्यक अभियंते, ९० दुय्यम अभियंते, ४० कनिष्ठ अभियंता व इतर आधारभूत कर्मचारीवृंद तसेच साफसफाईकरीता मुख्य पर्यवेक्षक, ८ उप मुख्य पर्यवेक्षक, ३०

सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, ६५ पर्यवेक्षक, ६३६ कनिष्ठ अवेक्षक, २३१२ मुकादम आणि २८,०१८ कामगार वर्ग हयांच्याकडून सहाय्य मिळते. संपूर्ण बृहन्मुंबईचे क्षेत्रफळ हे २४ प्रशासकीय विभागात विभागले गेलेले आहे. प्रत्येक विभाग एका सहाय्यक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली सोपविण्यात आला आहे. जसे विभागातील दैनंदिन महापालिकेच्या घन कच-याचे संकलन निरसन आणि परिवहनाची जबाबदारी विभाग सहाय्यक आयुक्त यांचे वर सोपविण्यात आलेली असून सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.), सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक आणि इतर कर्मचारीवृंद व कामगार थेट सहाय्यक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली काम करतात. घन कचरा व्यवस्थापन खात्यातील साफसफाई उपविभागातील प्रशासकीय विभागासह विविध प्रवर्गातील कर्मचा-यांची एकूण संख्या २९,५०० असून परिवहन उप विभागातील कर्मचा-यांची संख्या ४१८१ आहे. उप अभियंता (स्थापत्य)पर्यावरण हया उपविभागातील कर्मचा-यांची संख्या १६९ आहे.

## बृहन्मुंबईतील कच-याची निर्मिती

मुंबईतील प्रतिदिन डरडोई कच-याची निर्मिती जवळजवळ ४५० ग्रॅम आहे. सदर कचरा, केरकचरा, दगडमाती, शेण, सामाईक घरगल्ल्या किंवा जुन्या इमारतीमधील अरुंद, घरगल्ल्या दुर्गम गल्ल्यांमधून काढलेला संमिश्र स्वरुपात असतो. बृहन्मुंबईतील प्रतिदिन कच-याची निर्मिती अंदाजे ९६०० मे.टन असून यापैकी ६४७२ मे.टन जैविक विघटन होणारा कचरा, ५३२ मे.टन पुनर्चक्रित करण्याजोगा कचरा, १५०७ मे.टन अक्रियाशील पदार्थ आणि ७३४ मे.टन दगड माती स्वरुपात असतो.

## नागरी घन कचरा निर्मितीचे विविध मार्ग :-

१) घरातील कचरा
२) वाणिज्य कचरा
३) हॉटेल्स, उपहारगृहातील कचरा
४) मंडईतील कचरा

५) शाळा, कार्यालये, रुग्णालये इ. संस्थांमधून निर्माण होणारा कचरा

६) बांधकामाद्वारे माती, दगड, रेती इ. निर्माण होणार कचरा

७) रस्त्यांवरील साफसफाईचा कचरा

८) व्यवसाय कचरा

**<u>बृहन्मुंबईतील महापालिका घन कच-याची ( वजनाद्वारे) वर्गवारी / टक्केवारी खालील प्रमाणे आहे :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १) कागद, माती, पुठ्ठे | : | ०४ टक्के |
| २) प्लॉस्टिक | : | ०३ टक्के |
| ३) धातू(लोहयुक्त), काच व लाकुड | : | ०३ टक्के |
| ४) वाळू आणि बारीक माती | : | १७ टक्के |
| ५) ओला सेंद्रिय (टाकाऊ अन्न) | : | ७३ टक्के |

**<u>रस्ते झाडणे व कच-याचे संकलन</u>** :-

मुंबई शहर आणि शहरवासियांच्या स्वास्थ आणि आरोग्याच्या अनुषंगाने महापालिका प्रशासनात घन कचरा व्यवस्थापन खात्याची भूमिका अत्यंत महत्वाची आहे आणि म्हणून खात्यावर असलेली जबाबदारी संपूर्ण समर्पणाने आणि तत्परतेने पार पाडावी लागते. मुंबईतील सर्व सार्वजनिक रस्त्यांची दरदिवशी झाडलोट केली जाते. हे प्रचंड काम फक्त मनुष्य बळाने केले जाते. हे काम नियत क्षेत्रात केले जाते. नियत क्षेत्राचे क्षेत्रफळ शहर भागात जवळजवळ ४००० ते ५००० चौ.मीटर्स तर उपनगरात ८००० ते १०००० चौ.मीटर्स इतके आहे. प्रत्येक नियत क्षेत्रातील रस्ता झाडणीचे हे काम दोन झाडूवाल्यांकडून केले जाते. हे काम सकाळी ६.३० ते दुपारी १.३० आणि दुपारी २.०० ते रात्रौ ८.०० या दोन पाळीत केले जाते. या कामी ही जोडी एका कचरापेटीचा (ईझी बिन्स) वापर करते. हया पेटया १२० लिटर, २४० लिटर क्षमतेच्या असतात व १.१ घन मीटर क्षमतेच्या माईल्ड स्टील गॅल्वनाईझ्डच्या ओटोपशीर कचरा पेटयांमध्ये जवळपासचा गोळा करण्यात आलेला कचरा जमा केला जातो.

**<u>घन कच-याचे संकलन आणि तात्पुरती साठवण</u> :-**

बृहन्मुंबईतील अंदाजे ७८ टक्के लोकसंख्येला घरोघर जाऊन कचरा गोळा करण्याच्या पध्दतीची सेवा देण्यात येते आणि त्याबरोबर अंदाजे २२ टक्के लोकसंख्येला सामुहिक पेटी संकलन पध्दतीची सेवा दिली जाते. संपूर्ण बृहन्मुंबईमध्ये घन कच-याचे संकलन व तात्पुरती साठवण करण्याकरिता (यामध्ये फक्त केरकच-याचाच समावेश होतो). वेगवेगळया संकल्पनेच्या आणि बांधकामाच्या कचरापेटया सुमारे ३०५५ सार्वजनिक ठिकाणी पुरविण्यात आलेल्या आहेत. त्याठिकाणी ठेवण्यात आलेल्या कचरापेटयांची संख्या खालील प्रमाणे आहेः-

| | | |
|---|---|---|
| १) १.१ घनमीटर कचरापेटया | : | ६१०८ नग |
| २) ५.२ घनमीटर कचरापेटया | : | ३२५ नग |
| ३) स्टेशनरी कॉम्पॅक्टर्स | : | ५६ नग |

**<u>घन कच-याचे निरसन आणि परिवहन</u>**

घन कच-याचे निरसन आणि परिवहन करण्याकरिता महानगरपालिका मनुष्यबळाचा व यांत्रिक साधनाचा उपयोग करते. स्वतःचे कामगार व वाहनांच्या बरोबरीने अशासकीय कामगार आणि खाजगी ठेकेदारांच्या वाहनांच्याद्वारे देखिल केले जाते. मात्र दगड, माती व गाळ इ. उचलण्याकरिता खाजगी ठेकेदारांची वाहने व गरज भासल्यास कामगार वापरले जातात.

**<u>महापालिका कच-याचे निरसन व परिवहन करण्यासाठी वापरण्यात येणारी विविध प्रकारची वाहने</u> :-**

| | | **महानगरपालिका** | **खाजगी** |
|---|---|---|---|
| १) टिपर | : | ९८ | - |
| २) ट्रॅक्टर्स - ट्रेलर्स | : | १२ | - |
| ३) रिफ्यूज कलेक्टर कॉम्पॅक्टर्स (मोठे) | : | ११७ | ६३४ |
| ४) रिफ्यूज कलेक्टर कॉम्पॅक्टर्स (छोटे) | : | ३८ | ४५६ |
| ५) डंपर - प्लेसर | : | ८४ | - |
| ६) छोटी बंद वाहने | : | - | ३२५ |
| ७) इतर मध्ये स्टेशनरी कॉम्पॅक्टर | : | ७४ | - |
| ८) प्राईम मुव्हर | : | १२ | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९) दगड, गाळ व मातीसाठी (डंपर) | : | - | ५४ |
| १०) मोठी बंदिस्त वाहने (कॉम्पॅक्टर) | : | - | ३३ |
| ११) सुक्या कच-याचे टेंम्पो | : | - | ४६ |

कच-याच्या निरसन आणि परिवहनाचे काम सकाळी ६.३० ते दुपारी २ ते रात्री ८ या मुख्यत्वे दोन पाळयामध्ये केले जाते. परंतु परिस्थितीच्या गरजेनुसार रात्रपाळीत सुध्दा ही वाहने वापरली जातात. दगडमाती, गाळ, इ. च्या निरसनाचे व परिवहनाचे काम फक्त सकाळी ८ ते सायंकाळी ५ या सर्वसाधारण पाळीत केले जाते. महापालिकेची व ठेकेदारांची वाहने बंदिस्त प्रकारची असून यंत्राद्वारे रिकामी करण्याची सुविधा असलेली आहेत. ठेकेदारांची नेमणूक पाच वर्षांच्या कालावधीकरीता व प्रती पाळी सेवा या निकषावर केलेली आहे. महापालिका शहरी भागात महालक्ष्मी येथे ७०० मे.टन, पूर्व उपनगरात कुर्ला येथे प्रतिदिन ८०० मे.टन आणि पश्चिम उपनगरात वर्सोवा येथे प्रतिदिन ३५० मे.टन व गोराई येथे प्रतिदिन ४५० मे.टन क्षमतेची चार कचरा स्थानांतर केंद्रे कार्यरत आहेत. स्थानांतर केंद्रातून कच-याच्या परिवहनाचे काम १५ ते २० घन मिटर क्षमतेच्या बंदिस्त वाहनांचा वापर करुन करण्यात येते. महापालिका महापालिकेच्या परिवहन यानगृहाद्वारा कचरा गाडयांची देखभालीचे कामे आणि परिरक्षण करते. कच-याचे निरसन आणि परिवहन करण्याकरीता अनुसारीत पध्दतीनुसार महापालिकेच्या किंवा ठेकेदाराच्या प्रत्येक कॉम्पक्टर्स वाहनांवर गाडीवर ६ किंवा ४ महापालिका कामगार व १ मुकादमाची नेमणूक करण्यात येते.

शहरातील खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम्स्, प्रसुतीगृहे, चाचणी प्रयोगशाळा, क्लिनिक्स आणि दवाखाने यांच्याद्वारे (प्रतिदिन) अंदाजे ७ मे.टन आणि म.न.पा. रुग्णालयातुन अंदाजे ५ मे.टन जैविक वैद्यकिय कच-याची निर्मिती होते. शहरात दैनंदिन तयार होणा-या १२ मे.टन जैविक वैद्यकिय कच-याचे संकलन व परिवहन करुन खाजगी संस्थेद्वारेत्याची विल्हेवाट लावण्याकरिता देवनार येथे केंद्रीभूत प्रक्रिया सुविधा पुरविण्याकरीता मेसर्स.एस.एम.एस. एन्व्होक्लीन यांना (बांधा, वापरा, स्वामित्व, हस्तांतरण

तत्वावर) महापालिकेतर्फे नेमण्यात आलेले आहे. या केंद्रामध्ये इनसिनरेशन आणि ऑटोक्लेव्हींग पध्दतीने जैविक वैद्यकिय कच-यावर प्रक्रिया करण्यात येते.

**महापालिका घन कच-याची विल्हेवाट :**

मुबंईतील नागरी घनकच-याची विल्हेवाट लावण्याकरीता खालील विविध पध्दतींचा अवलंब करण्यात येतो:-

अ) सेंद्रिय खते निर्माण करण्याकरीता संस्करण

ब) गांडूळ शेती/खत प्रकल्प

क) भूमीभरण

मुंबईतील दैनंदिन निर्माण होणा-या कच-यापैकी काही भागाचा गांडूळ खते या नावे प्रसिध्द असलेल्या पर्यावरण मित्र, नैसर्गिक प्रक्रियेद्वारा विल्हेवाट लावली जाते. हया पध्दतीने शहरातील विविध ठिकाणच्या गृहनिर्माण संस्थातून व उपहारगृहातून निर्माण होणा-या ३ टक्के कच-यावर प्रक्रिया केली जाते.

**एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प :** मुंबई मधील दररोज निर्माण होणा-या कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० अन्वये देवनार व मुलुंड क्षेपणभूमीवरील व कांजुर भरावभूमी येथे एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प हाती घेतले असून सदर प्रकल्पाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

**१. देवनार क्षेपणभूमी प्रकल्प :** देवनार प्रकल्पांतर्गत ६५ हेक्टर मधील क्षेपणभूमी अंशताः बंद करणे आणि तेथील ५५ हेक्टर भागाभोवती कुंपणाची भिंत बांधणे, प्रशासकीय इमारत, मुख्य रस्ता, अंतर्गत मार्ग, दिवे व पाण्याची व्यवस्था इत्यादी कामे करण्यासाठी दि.०१ डिसेंबर, २००९ रोजी सदर जागा मे. तत्व ग्लोबल एनव्हायरमेंट (देवनार) लि. यांस खाजगी तत्वावर चालवण्यास, प्रकल्पांतर्गत कामांकरीता सोपवण्यात आली आहे. हया मध्ये १००० टन प्रतिदिन क्षमतेची दोन कंपोस्ट केंद्रे उभारणे, लीचेट प्रक्रिया केंद्र आणि दोन शास्त्रोक्त क्षेपणभूमींची निर्मिती समाविष्ट आहे. पसरलेला

घनकचरा, अंशता आच्छादित करून ६५ एकर जागेत हलवून, त्या भागात योग्य त्या उतारासह रचला जाईल. देवनार क्षेपणभूमी व सभोवतालच्या पर्यावरणीय स्थितीवर सक्षम नियमन करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत :

१.खाजगी प्रचालकाद्वारे दुर्गंध रोधक व किटक नाशकांचे फवारे घनकच-याच्या पृष्ठभागावर मारले जातात. हयाद्वारे दुर्गंधी व माश्यांच्या प्रादुर्भावाला आळा बसतो. मिथेनमुळे लागणा-या आगी व धूराची समस्या निवारणासाठी, खाजगी यंत्रणेद्वारे पाण्याचे टँकर्स व तत्सम यंत्रणेचा वापर केला जातो.

२. देवनार क्षेपणभूमी व सभोवतालच्या परिसरातील प्रदूषण नियंत्रण करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत Air Quality Monitoring and Research Laboratory यांच्यातर्फे दरमहा सभोवतालच्या हवेतील वायुचे सर्वेक्षण केले जाते. तेथील पाण्यातील रंग, वास इत्यादीचे सर्वेक्षण केले जाते. त्याबरोबर ध्वनी प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने तेथील ध्वनीपातळीचे सर्वेक्षण केले जाते.

३. देवनार क्षेपणभूमीलगतच्या खाडीत प्रदूषण होू नये व तिवरांच्या संरक्षणासाठी, येथे निर्माण होणा-या लीचेटवर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रियाकेंद्र उभारण्याचे काम हयात अंतभुर्त आहे.

४. २००० टन प्रतिदिन घनकच-यातून कंपोस्ट खत बनवण्याची यंत्रणा कार्यान्वीत झाल्यावर नियमितपणे २००० टन घनकच-यावर दर दिवशी प्रक्रिया शक्य होईल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे वरीलप्रमाणे उपाययोजना केल्यावर देवनार परीसरातील हवेचे प्रदूषण कमी होऊन तेथील नागरीकांना खात्रीने आरोग्यदायी वातावरणाचा लाभ होईल.

**२. मुलुंड क्षेपणभूमी प्रकल्प :** मुलुंड प्रकल्पाकरिता मंडई व उपहारगृहांमध्ये जमा होणा-या ५०० मे.टन कच-यापासून बायोमिथेनेशन प्रकल्प उभारून ६.९ मे.वॅट विद्युत निर्मिती करण्याचे काम प्रचालकास देण्यात आले आहे. प्रचालकांनी मुलुंड क्षेपणभूमीचे सर्वेक्षण इत्यादी प्राथमिक कामे पूर्ण केली आहेत. तसेच बायोमिथेनेशन प्रकल्प उभारण्यासाठी ४ हेक्टर जागा उपलब्ध करून दिली आहे. क्षेपणभूमी परिसरात निर्माण होणारी दुर्गंधी,

किटक, माशा, आगीवर व धुरावर नियंत्रण मिळवण्यासाठी, महापालिकेने क्षेपणभूमीवर पाण्याचे टँकर उपलब्ध केलेले आहेत. तसेच फवारणी करण्यासाठी ट्रॅक्टरवर फवारणी यंत्रणा बसवून त्यांचेमार्फत पाणी मिश्रित जंतुनाशक औषधांची फवारणी केली जाते. हया औषधाचा दर्जा परिसरावर विपरीत परिणाम होणार नाही असा असतो. व त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत. नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी, दुर्गंधीवर नियंत्रण मिळविण्यासाठी ही औषध फवारणी तपासणी नाक्यावर, कचरा वाहून नेणा-या वाहनांवर केली जाते. त्याचप्रमाणे वायुंचे निर्गमन होण्यासाठी कच-याच्या ढिगा-यात पाईप टाकून निर्माण होणा-या वायूचे निर्गमन करण्यात येते. त्यामुळे क्षेपणभूमीत आगी लागण्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे.

**३. कांजूर भरावभूमी प्रकल्प :** मा. उच्च /सर्वोच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार राज्य सरकारने कांजूर येथील १४१.७७ हेक्टर भूखंड दि.२४.१०.२००५ रोजी क्षेपणभूमीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वाधीन केला. शदर प्रकल्पांतर्गत जमीन सागरी किनारा नियंत्रण (CRZ) नियमावलीपासून व तिवरांच्या जंगलापासून मुक्त अशा ६५.९६ हेक्टर क्षेत्रात घन कच-यावर प्रक्रिया व विल्हेवाट लावण्यासाठी यंत्रणा उभारण्यास दि.१७.०३.२००९ रोजी सदर प्रकल्पास केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडून पर्यावरण विषयक मंजुरी प्राप्त झाली. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या तांत्रिक अभ्यास समितीच्या दि.२५.०७.२०११ रोजी झालेल्या सभेमधील शिफारशीनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने, नागरी घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम -२००० नुसार दि.२०.१०.२०११ रोजी प्राधिकृत केले आहे.

सदर प्रकल्पास तंत्रज्ञानातील बदलामुळे आवश्यक असलेली सुधारीत पर्यावरण मंजुरी यांच्याकडून प्राप्त झाली आहे.

१००० टन प्रतिदिन क्षमतेच्या घन कच-यावर खत निर्मिती प्रक्रियेकरीता प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. कांजूर येथील लॅंडफिल बायो रिऍक्टर टप्पा – १ येथे दररोज कचरा स्विकारणे दि.०६.०३.२०१५ पासून सुरू केले आहे.

**नजिकच्या भविष्यातील योजना :**

१) वरील प्रकल्पामध्ये प्रक्रिया होणार असलेल्या कच-याशिवाय अधिकच्या कच-यावरील प्रक्रियेसाठी प्रत्येकी सुमारे १००० मे.टन प्रतिदिन इतक्या क्षमतेचे एकूण २ घन कचरा प्रक्रिया प्रकल्प केंद्रशासनाच्या अर्थ खात्याच्या मदतीने विकसित करण्यासाठी जागतिक स्तरावर निविदा प्रक्रिया चालू आहे. कच-यापासून वीज निर्मिती करण्यासाठी सध्या दोन प्रकल्प आरएफक्यू (पात्रतेसाठी विनंती अर्ज) च्या टप्प्यावर आहेत. प्रत्येक प्रकल्पांची क्षमता २००० मे.टन एवढी आहे. सदर प्रकल्प हे सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर आणि (DBFOT) रचना, बांधणी, अर्थव्यवस्था, प्रचालन आणि हस्तांतरण पध्दतीने होणार आहेत. नजीकच्या काळात ३००० मे.टन तयार होणा-या कच-याचे विघटन करून त्यापासून वीज निर्मिती तयार करण्यात येईल.

२) तसेच कचरा प्रक्रियेच्या विकेंद्रीकरणासाठी जागतिक स्तरावर स्वारस्य अभिव्यक्ति मागविण्यात आल्या आहेत.

३) देवनार व मुलुंड क्षेपणभूमीची क्षमता संपत आल्यामुळे मुंबई महानगरपालिकेतर्फे कच-यावर प्रक्रिया करण्यासाठी तळोजा येथे जमीन उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे जानेवारी २०१५ मध्ये सादर केला आहे. त्यासाठी तळोजा येथील १६१ हेक्टर पैकी ६६ हेक्टर जागा मुंबई महापालिकेला कचरा प्रक्रिया करण्यासाठी वापरण्याबाबत एमएमआरडीएच्या अधिका-यांनी अनुकुलता दर्शविली आहे.

**शून्य कचरा संकल्पना योजना :**

महापालिकेने शून्य कचरा संकल्पनेसाठी योजना आखली आहे.

१. अविघटनशील कचरा व जैविक विघटनशील वेगळा करून तो पुनःचक्रीत करणे वा कंपोस्ट करणे.

२. निवासी संकुलात गांडूळ खत बनविण्यासाठी प्रोत्साहन देणे.

३. भाजी मंडयातील कच-यापासून उद्यानासाठी उपयुक्त असलेले गांडूळ खत बनविणे.

४. अशासकीय तसेच सामाजिक संस्थाच्या मदतीने घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी, तसेच गांडूळ खत तयार करण्यासाठी रोजगार उपलब्ध करणे.

५. भराव करावयाच्या क्षेत्राचा विकास व त्यावर वृक्ष लागवड करणे.

**<u>मृत प्राण्यांचे विस्थापन</u> :-**

मुबंई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३६७(सी) व ३८५ अन्वये बृहन्मुंबई हद्दीत मरणा-या मृत प्राण्यांची शरीरे गोळा करणे, उचलणे व त्यांची विल्हेवाट लावणे याची व्यवस्था महापालिका आयुक्तांना करावी लागते. मृत जनावरे उचलण्याकरीता, मृत जनावर ज्याच्या मालकीचे आहे किंवा ज्याच्या जागेत जनावर मृत झालेले आहे त्या मालकाला/व्यक्तिला शुल्क आकारण्याकरीता महापालिका आयुक्तांना अधिकार देण्यात आलेले आहेत.

हे जरी महापालिकेचे आवश्यक कर्तव्य असले तरी महापालिकेकडे मृत प्राण्यांच्या शरीरांची विल्हेवाट लावण्याकरीता सुयोग्य जागा व संयंत्रे नाहीत. म्हणून मृत प्राण्यांची शरीरे गोळा करणे, उचलणे व त्यांची विल्हेवाट लावणे यांचे अधिकार खाजगी एजन्सीला कंत्राटी आधारावर प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा नेमणूक करण्यात आलेल्या एजन्सीला, आयुक्तांनी तयार केलेल्या सूचीप्रमाणे मृत प्राण्यांच्या मालकाकडून, मृत प्राण्यांची शरीरे उचलण्याबाबतचे शुल्क वसूल करण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. मे. मुंबई खादी आणि ग्रामोद्योग संघ हयांची मागील २० वर्षांपेक्षा अधिक काळाहून हया कामासाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. हे काम त्यांच्याकडे सोपविताना खालील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत :-

अ) मृत पशूंची विल्हेवाट लावण्याकरीता या संघाने ठाणे जिल्हयातील बापने या गावी ड्राय रेडरिंग सयंत्र (प्लान्ट)बांधले असून या कामाकरीता अन्न व कृषी संघटनेच्या सहाय्याने अद्यावत यंत्रसामुग्री बसविली आहे. हे सयंत्र चालू ठेवण्याकरीता कच्चा

माल म्हणून त्यांना मृत पशूंच्या शरीराची गरज असल्याने संघ महानगरपालिकेवर अवलंबून आहे.

ब) संघाला या कामाचा पूर्वीचा अनुभव आहे. संघ जरुर पडेल तितके मृत पशू महानगरपालिकेकडून मिळवेल या अटीवर तांत्रिक ज्ञान व अद्यावत उपकरणे विनामूल्य देण्याचे आश्वासन संघाला संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्न व कृषी संघटनेकडून मिळालेले आहे.

क) ना नफा ना तोटा या तत्वावर संघ हे काम ग्रामोद्योगाच्या उन्नतीकरीता करीत असून यापासून मिळणा-या फायद्याचा उपयोग त्या परिसरात राहणा-या लोकांकरीता केला जातो.

ड) मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ३८५ तील तरतूदीनुसार महानगरपालिकेला मृत पशूची विल्हेवाट लावण्याकरीता जागा निर्देशित करणे आवश्यक आहे. तथापि, सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात अशी कोणतीच योग्य जागा नाही. मृत पशूंची विल्हेवाट लावण्याकरीता असलेली संघाची जागा ही बृहन्मुंबईच्या हद्दीबाहेर ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यातील बापने या गावी आहे व ती जागा (मृत पशूंची) विल्हेवाट लावण्याकरीता योग्य अशी जागा आहे असे आढळून आले आहे.

**<u>पर्यावरणाचे संतूलन राखण्याकरीता भविष्यातील योजना</u>** :-

मुंबईमध्ये दररोज होणारा घन कचरा मुलतःकमी करण्याची तातडीची गरज लक्षात घेऊन, महानगरपालिका विविध पर्यायी योजना राबवत आहे. कचरा उत्पन्न होणा-या प्रारंभिक स्थानापासून ओला कचरा व सुका कचरा वेगळा करण्यासाठी गलिच्छ वस्त्यात, वस्ती स्वच्छता योजना प्रगत परिसरांचे व्यवस्थापन इ. सारख्या विविध योजना राबविण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. याकरिता ३ R Principles (Reduce, Reuse & Recycle) या तत्वाचा स्विकार करून ओला कच-याचा उपयोग गांडूळ खत तयार करण्यासाठी केला जात आहे व पुर्नचक्रांकन करून सुक्या कच-याचा पुर्नवापर करण्यात येतो.

केंद्र सरकारने २००० साली लागू केलेल्या महापालिका घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियमाची ३१.१२.२००३ पर्यंत अंमलबजावणी करणे आवश्यक होते. घन कचरा गोळा करणे व वाहून नेणे या संबंधीच्या नियमांचे पालन करण्यामध्ये महानगरपालिका ब-यापैकी यशस्वी झाली तरी कच-याची विल्हेवाट लावणा-या प्रक्रियेची क्षमता कमी असल्यामुळे, या नियमांचे पूर्णपणे पालन करण्यात यशस्वी होवू शकली नाही. तरी शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी, घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, ओला व सुका कचरा वेगळा करणे, पातळ प्लास्टिक उत्पादकावर व वापरावर बंदी घालणे, नागरी उद्यानाचे, रस्त्याचे, पदपथाचे सुशोभिकरण, रस्त्याच्या दुतर्फा व मोकळया जागेत झाडांची लागवड करणे इत्यादी सारख्या विविध योजना राबवल्या जात आहेत. यामुळे घन कचरा व्यवस्थापन महत्वतेची सामाजिक जाणीव वाढीस लागत आहे.

मुंबईतील तसेच उपनगरातील झोपडपट्टयात राहणा-या व्यक्ति प्रातःविधीसाठी मोकळया जागांचा वापर करतात. त्यावर उपाय म्हणून निमशासकीय संस्थामार्फत महापालिकेची सार्वजनिक शौचालये चालविली जात आहेत. हया शौचालयाच्या दुरूस्त्या व परिरक्षणाच्या कालावधीत पर्यायी व्यवस्था म्हणून महापालिकेतर्फे फिरती शौचालये उपलब्ध करून देते व त्यासाठी काही रक्कम घेतली जाते. तसेच मुंबईत होणा-या मोठया कार्यक्रमाच्यावेळी नागरिकांसाठी फिरत्या शौचालयाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्या संघटना महापालिकेला अन्य काही उपक्रमात मदत करतात. अशा सामाजिक संघटनांना महापालिका ही सुविधा मोफत पुरविते. पण इतर संघटनांसाठी हयासाठी शुल्क आकारले जाते. तसेच महामार्गावरील स्वच्छता राखण्यासाठी तेथे शौचालये बांधण्यात येत आहेत.

क्षेपणभूमींच्या सभोवताली वृक्ष लागवड केली असून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम प्रगतीपथावर आहे, ज्यामुळे निवासी वस्ती व क्षेपणभूमी यांच्या दरम्यान एक हरित पट्टा तयार होईल.

संपूर्ण स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून ज्या भागात महापालिकेच्या कामगारांमार्फत स्वच्छतेची सेवा पुरविली जात नाही अश्या भागांसाठी, अशासकीय संस्था व सी.बी.ओ.

हयांच्या सहयोगाने स्वच्छता अभियान राबवण्याची नवीन पध्दत अवलंबली आहे. या सेवेमध्ये झाडलोट करणे तसेच कचरा वाहून नेणे इत्यादी अंर्तभूत आहे जेणेकरून १०० टक्के स्वच्छता राखता येते. कचरा उचलल्यावर तेथील परिसरात ब्लिचिंग पावडरची फवारणी केली जाते.

विविध योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करुन त्या पूर्णत्वास नेण्याकरीता महानगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. दृष्टीक्षेत्रात असलेल्या या योजनांमध्ये कचरा निर्मितीच्या उगमस्थानीच ओल्या-सुक्या कच-याचे वर्गीकरण, गांडूळ खते, विलग्न केलेल्या कच-यापैकी काही भागांच्या क्षेत्रांच्या काही भागांचे सुशोभीकरण करण्याकरीता उपयोग, कच-यापासून विजनिर्मिती संयंत्रे चालू करुन भूमिभरण जागांची क्षमता वाढवून क्षेपणभूमींचा विकास करणे, रस्त्याची झाडलोट आणि संकलन या करीता यांत्रिकीकरण स्विकारणे, घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याच्या योजना चालू करणे आणि कच-याचे रात्रीच्या वेळेत परिवहन करणे यांचा समावेश होतो. या ठिकाणी या गोष्टींचा उल्लेख करणे मोलाचे ठरेल की लोकसंख्येच्या सुयोग्य प्रमाणात सार्वजनिक आरोग्यविषयक सोयींच्या स्वरुपात नागरीकांना देण्यात येणा-या सुविधा वाढविण्याबरोबरोच उपरोक्त उल्लेखिलेल्या योजनांमध्ये गलिच्छ  वस्ती क्षेत्र समाविष्ट करण्यात येत आहे.

मुंबई शहरातील नागरीकांच्या स्वास्थ्य आणि आरोग्यासाठी पर्यावरणविषयक योजना परिरक्षित करण्याचे प्रक्षेपित आणि तयार केलेले उदिष्ट गाठण्याकरीता आशावादी दृष्टीकोन नागरी प्रशासनामध्ये आत्मविश्वास निर्माण करतो.

**प्रगत परिसर व्यवस्थापन** :- बृहन्मुंबई महानगरपालिकेने विभागातील संलग्न गटांच्या बरोबरीने ''प्रगत परिसर व्यवस्थापन'' ही संकल्पना साकारलेली आहे. हे गट प्रगत परिसर व्यवस्थापन रस्ता समित्या स्थापन करतात आणि कचरा, वस्ती स्वच्छता योजना यासारख्या नागरी विषयांशी निगडीत बाबींच्या उत्तम व्यवस्थापनासाठी आपापल्या विभाग कार्यालयाशी

समन्वय साधतात. आजमितीस जवळजवळ ७२० प्रगत परिसर व्यवस्थापन स्थापन झाले आहेत.

प्रगत परिसर वसाहत व्यवस्थापनात पुढील गोष्टी करणे अपेक्षित आहे :-
१) तयार होणा-या कच-याचे प्रमाण कमी करावयाचे आणि तयार झालेला कोरडा कचरा परत वापरुन पुनर्निर्मितीकडे वळविणे. २) कच-याची विल्हेवाट करण्यापूर्वी ओला कचरा व सुका कचरा विभागून वेगवेगळा साठविणे. ३) सोयीनुसार वेगवेगळया मार्गांनी ओल्या व कोरडया कच-याची विल्हेवाट लावणे.

सुक्या कच-याची रद्दीवाले, कागद वेचणारे, स्थानिक सफाई कामगार यांच्यामार्फत विल्हेवाट लावण्यांत येते. काही प्रगत परिसर गटांमध्ये खतनिर्मिती करण्यांत येते व अंदाजे प्रतिदिन ५ टन ओल्या कच-याचे खतामध्ये रुपांतर करण्यांत येते.

**स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान** :- दत्तक वस्ती योजना ही बंद करून त्याऐवजी स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. झोपडपट्टीत राहणा-या लोकांचे आरोग्य अबाधित राहावे म्हणून त्यांच्यासाठी घनकचरा व्यवस्थापन खात्याने 'दत्तक वस्ती योजना' याद्वारे स्वच्छता राखण्यात येत होती. सदर दत्तक वस्ती योजना दि. ३१.०३.२०१३ पासून बंद करण्यात आलेली आहे व त्याऐवजी दि.०१.०४.२०१३ पासून "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" (वस्ती स्वच्छता योजना) ही योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्याने सुरू केली आहे. मुंबई शहर व उपनगरात विस्तारलेल्या झोपडपट्टीक्षेत्रांमध्ये म.न.पा. आपल्या यंत्रणेमार्फत नियमीत स्वच्छतेच्या सेवा देणे शक्य नाही अशा वसाहतीमध्ये या योजनेद्वारे कार्य करते. हया योजने मध्ये एका एकक मध्ये १५० कुटुंबे किंवा ७५० लोकसंख्या असे प्रमाण असते. सदर योजनेच्या अंमलबजावणी करीता दरमहा सहाय्य अनुदान अधिदान करण्याकरीता एक एकक हे प्रमाण असते. त्याप्रमाणे एका एककाकरीता प्रति महा अनुदान रू. ५४००/- अधिक संस्थेला योजना कामामध्ये प्रबोधन, लोकसहभाग, जनजागृती, वातावरण निर्मिती इत्यादी अनुशंगीक खर्च करणे शक्य व्हावे या करीता एका एकका

करीता प्रतिमहा रू. ६००/- इतके अतिरिक्त अनुदान अधिदान करण्यात येते. सदर योजनेच्या खर्चाकरीता सन २०१३-१४ हया आर्थिक वर्षाकरीता अंदाजे ८० कोटी रूपये एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर योजनेत प्रत्येक पात्रताधारक संस्थेला किमान ५ एकके व कमाल १८ एकके असलेला परिसर योजना अंमलबजाणी करीता देण्यात येतो. तसेच एककांच्या अशा गटाला या योजनेत "वस्ती" असे संबोधण्यात येतो. सदर योजना ही महानगरपालिकेच्या २४ विभागातील परिसरात कार्यन्वीत करण्यात आलेली आहे.

**रस्ते स्वच्छता योजना** :- मुंबई शहरातील विशेषतः उपनगरातील सेवा न पुरविण्यात येणा-या व नव्याने विकसित होत असलेल्या विभागात साफसफाई करण्यासाठी महापालिकेतर्फे रस्ते स्वच्छता योजना राबविण्यांत येत आहे. या अभियानांतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्थांना अंदाजे ८ महिन्यांच्या कालावधीसाठी सफाईचे काम दिले जाते.

**उपविधि** :- घन कच-याचे संकलन, वहन आणि विल्हेवाटीशी निगडीत सर्व बाबी आणि वस्तू नियमित करण्यासाठी मुंबई महापालिका अधिनियमातील कलम ४६१ (ई आय) अंतर्गत ''बृहन्मुंबई स्वच्छता आणि आरोग्य उपविधि, २००६" तयार करण्यांत आलेले आहेत. सदर उपविधिस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली असून ते दि.१४.१२.२००६ रोजीच्या क्र.बीएमसी/२३२६/४०७४/प्र.क्र.२३८/०६/नवि-२१ अंतर्गत राजपत्राव्दारे अधिसूचित केलेले आहेत. मुंबई शहर व उपनगरातील परिसर स्वच्छ ठेवून नागरिकांचे आरोग्य अबाधित रहावे म्हणून महापालिका सतत प्रयत्नशील असते. यासाठी नागरिकांना स्वच्छतेचे महत्व विविध प्रसार माध्यमांव्दारे पटवून, त्यांच्यात जागृती निर्माण करुन विविध उपाय योजना, उपक्रम राबविण्यांत येतात. यासाठी नागरिकांचा, मान्यवर व्यक्तिंचा, नगरसेवकांचा, विविध शासकीय / अशासकीय संस्थांचा सहभाग व सहकार्य घेतले जाते. जे नागरिक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण करुन उपद्रव निर्माण करतात अशा उपद्रवींवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी उपद्रव शोधक पथकांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. हे कार्य अधिक जोमाने व प्रभाविपणे पार पाडण्यासाठी

‘‘बृहन्मुंबई स्वच्छता आणि आरोग्य उपविधि, २००६“ तयार करण्यांत आलेले आहे. या उपविधितील नियमांचे प्रत्येक नागरिकाने पालन करणे अत्यावश्यक व अनिवार्य आहे. ज्या नागरिकांकडून या नियमांचे उल्लंघन होईल ते उपविधिसोबत दिलेल्या सूचीप्रमाणे दंडास पात्र ठरतील. सदर उपविधिंची क्लिन-अप मार्शलद्वारे दि.१५.११.२००७ पासून प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे.

जे नागरिक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण करून उपद्रव निर्माण करतात अशा उपद्रवकारकांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी उपद्रव शोधक पथकांची व सुरक्षा संस्थाद्वारे क्लिन-अप मार्शलची नियुक्ती करण्यात आलेली आहे. उपविधीतील तरतुदीनुसार मिळालेल्या दंडात्मक महसुलापैकी ५० टक्के रक्कम महापालिकेला मिळत असून क्लिन अप मार्शलने, सन २००८ पासून २०१३ पर्यंत अंदाजे ११.५ लाख लोकांवर दंडात्मक कारवाई करून रू.२३.५० कोटी इतका महसूल मिळवून दिला आहे. हया उपविधितील नियमांचे प्रत्येक नागरिकाने पालन करणे अत्यावश्यक व अनिवार्य आहे. ज्या नागरिकांकडून हया नियमांचे उल्लंघन होईल ते पुढे दिलेल्या सूचीप्रमाणे दंडास पात्र ठरतील:-

| **अनु. क्र.** | **उपविधि क्रमांक** | **उपविभाग तपशील** | **उपविधि उल्लंघन केल्यास दंडाची अंतिम रक्कम** |
|---|---|---|---|
| **उपविधि क्र. ४.१ कचरा फेकणे, उपद्रव करणे व साफ आंगण** | | | |
| १ | **४.१ ते ४.४** | इतस्ततः फेकणे | रू. २००/- |
| २ | **४.५** | उपद्रव करणे, थुंकणे | रू. २००/- |
| ३ | | स्नान करणे | रू. १००/- |
| ४ | | लघवी करणे | रू. २००/- |
| ५ | | शौचास बसून घाण करणे | रू. १००/- |
| ६ | | निर्देशित न केलेल्या ठिकाणी प्राणी/ पक्षी यांना अन्न खाऊ घालणे | रू. ५००/- |
| ७ | | रस्त्यावर वाहने धुणे /दुरूस्त करणे | रू. १०००/- |
| ८ | | भांडी /कपडे/तत्सम बाबी धुणे | रू. २००/- |
| ९ | **४.६** | आपले अंगण स्वच्छ न ठेवणे<br>अ) एकाच आवाराच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मालकासाठी /भोगवटादारासाठी<br>ब) इतरांसाठी | रू. १०००/-<br>रू. १०,०००/- (हा दंड क्लिन अप मार्शल द्वारे आकारण्यात येणार नाही) |

| उपविधि क्र. ५- कचरा विभक्तीकरण, साठवण, पुरवठा व संकलन | | | |
|---|---|---|---|
| १० | **५.१ ते ५.२** | कचरा विभक्तीकरण करून न दिल्यास अथवा कचरा स्वतंत्र डब्यात न साठवल्यास<br>१) वैयक्तिक<br>२) मोठे निर्माते | <br><br>रू. १००/-<br>रू. ५००/- |
| ११ | **५.३** | निर्देशाप्रमाणे ओला कचरा विभक्तीकरण करून न दिल्यास | रू. १००/- |
| १२ | **५.५** | धोकादायक कच-याचे निर्देशित पध्दतीने विभक्तीकरण करून पुरवठा न केल्यास<br>१) वैयक्तिक<br>२) मोठया प्रमाणावर | वैयक्तिक रू. १०००/-<br>मोठया प्रमाणावर रू. १०,०००/-<br>(हा दंड क्लिन अप मार्शल द्वारे आकारण्यात येणार नाही) |
| १३ | **५.६** | जैविक वैद्यकिय कचरा निर्देशाप्रमाणे विभक्तीकरण करून न दिल्यास | रू. २०,०००/-<br>(हा दंड क्लिन अप मार्शल द्वारे आकारण्यात येणार नाही) |
| १४ | **५.७** | बांधकाम /पाडकाम कचरा निर्देशाप्रमाणे विभक्तीकरण करून न दिल्यास | रू. २०,०००/-<br>(हा दंड क्लिन अप मार्शल द्वारे आकारण्यात येणार नाही) |
| १५ | **५.८** | निर्देशाप्रमाणे सुका कचरा विभक्तीकरण करून न दिल्यास | रू. १००/- |
| १६ | **५.९** | निर्देशाप्रमाणे झाडांच्या फाद्या अथवा बांधकाम कचरा विभक्त करून न दिल्यास | रू. १००/- |
| १७ | **५.१०** | कचरा जाळून निष्कासित केल्यास | रू. १००/- |

| उपविधि क्र. ७ विशिष्ट गट/ प्रासंगिक | | | |
|---|---|---|---|
| १८ | **७.२** | अनिवासी स्वरूपाचा कोंबडया/मासळी/कत्तलीचा कचरा विभक्तीकरण करून न दिल्यास | रू. १०००/- |
| १९ | **७.३** | अ) विक्रेते/फेरीवाले हयांनी कचरा डबा न ठेवल्यास<br>ब) विक्रेते/फेरीवाल्याने कचरा विभक्तीकरण करून न दिल्यास | रू. ५००/-<br>रू. ५००/- |
| २० | **७.४** | घरगल्ली स्वच्छ न ठेवल्यास | रू. २००/- |
| २१ | **७.५** | पाळीव /मालकीच्या प्राण्यांनी कचरा केल्यास | रू. ५००/- |
| २२ | **७.६** | सार्वजनिक मेळावे व कार्यक्रमानंतर, २४ तासांत स्वच्छता न केल्यास | स्वच्छता अनामत रक्कम जप्त |
| २३ | **७.८** | रस्ते सफाईच्या वेळी वाहन रस्त्यावर उभे केल्यामुळे अस्वच्छता निर्माण होत असल्यास | रू. ५००/- |
| २४ | **७.१०** | भिंत्तीपत्र चिकटवणे / भिंती रंगवणे | रू. ५००/- ते रू. ५,०००/- |